# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


जावक क्रमांक :- २०० दिनांक :- २३/०७/२०२१

## अवैध दारु भट्टीवर कारवाई करुन ७५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त- विरार पोलीस स्टेशनची कारवाई

दिनांक २३/०७/२०२१ रोजी सकाळी ९:०० वाजताचे सुमारास विरार पोलीस ठाणे अंतर्गत मांडवी दुरक्षेत्र हद्दितील मौजे तिल्हेर गावचे पुर्वेकडील जंगलात डोंगराळ भागात नाल्याजवळ तिन संशयीत इसम हे बेकायदेशिररित्या ३ गावठी दारु तयार करण्यासाठी गुळ-नवसागर मिश्रीत सुमारे ३००० लिटर रसायन तयार करुन साधनांद्वारे भट्टी लावून त्याद्वारे सुमारे ३०० लीटर गावठी हातभट्टीची दारु विक्री करीता बेकायदेशिररित्या तयार करीत असतांना मिळून आले. सदर संशयीतांकडून कारवाई दरम्यान सुमारे ७५,०००/- रुपये किंमतीचा प्रोव्हिशन गुन्हयाचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईबाबत विरार पोलीस स्टेशन येथे गुरनं ६३२/२०२१ मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ ३, श्रीमती रेणुका बागडे, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस स्टेशनचे वपोनि. श्री. सुरेश वराडे, पोनि. दिलीप राख, सहापोनि. श्री. भुवनेश्वर घनदाट, पोना. २०३२ शिंदे, मराठे, गवळी, पोशि. वाघमोडे, सचिन झनकर, होंडे, मोरे, गणेश प-हाड व जाखेरे यांनी केलेली आहे.



---oooo----